

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, बुधवार पेठ येथील अस्थिविहार ,कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

Volume III Issue 03 Date 14-04-2024

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बुधवार पेठ येथील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार या ठिकाणी अतिरिक्त आयुक्त संदीप कारांजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, नगर अभियंता सारिका अकुलवार, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे. मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, श्रीनिवास रामगल,मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाचे नागेश रणखांबे,प्रा संघमित्रा चौधरी,व्यंकटेश भंडारे,अमोल धेंडे,अनिल सोनकांबळे,शशी कांबळे,अरुण भालेराव,शिवम सोनकांबळे,बापू सदाफुले व सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.



